भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानूमान कृषि सल्ला पत्रक - सिंधूदुर्ग

कालावधी (दिनांक १८.०३.२०२० ते २२.०३.२०२०)

| अंक २१/२०२० | दिनांक १७.०३.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (११/०३/२०२० ते १७/०३/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पूढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानूमान (वैधता १८/०३/२०२० ते २२/०३/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११/०३ | १२/०३ | १३/०३ | १४/०३ | १५/०३ | १६/०३ | १७/०३ | दिनांक | १८/०३ | १९/०३ | २०/०३ | २१/०३ | २२/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३५.० | ३५.५ | ३५.५ | ३६.० | ३८.० | ३८.० | ३५.५ | कमाल तापमान (अं. से) | ३३ | ३२ | ३२ | ३२ | ३१ |
| १८.० | १८.० | १८.० | १८.० | १७.० | १७.० | २२.० | किमान तापमान (अं. से) | २१ | २१ | २० | २० | २० |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ — मेघाच्छादन (ऑक्टा.) | १ | ३ | ० | ० | २ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार — मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ८३ | ९१ | ८३ | ८२ | ८२ | ८१ | ८८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८३ | ८४ | ८४ | ८५ | ८५ |
| ४५ | ४७ | ४० | ३६ | ३५ | ५६ | ४७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६१ | ६१ | ६३ | ६३ | ६३ |
| १.९ | २.८ | २.३ | १.९ | १.९ | १.८ | २.६ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००३ | ००७ | ०१० | ००८ | ००८ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ — वा-याची दिशा | आग्नेये | दक्षिणे | आग्नेये | आग्नेये | आग्नेये |
| दक्षिण | दक्षिण | पश्चिम | पश्चिम | पश्चिम | पश्चिम | दक्षिण | दुपार — वा-याची दिशा | कडून | कडून | कडून | कडून | कडून |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या आठवड्यात सापेक्ष आद्रतेमध्ये घट होऊन तापमान वाढण्याची शक्यता आहे. तसेच हवामान कोरडे व अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | फ़ुलोरा ते फळधारणा | येत्या आठवड्यामध्ये तापमान वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या आंबा कलमांना उन्हापासून संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>फळमाशींच्या नियंत्रणासाठी विद्यापीठाने विकसित केलेले मिथिल युजिनॉलयुक्त ‘रक्षक सापळे’ प्रती हेक्टरी चार या प्रमाणात आंबा बागेमध्ये लावावेत.<br>कातळावरील व जांभ्या खडकातील आंबा लागवडीमध्ये फळगळ टाळण्यासाठी १% कॅल्शिअम नायट्रेट्ची फवारणी करावी<br>आंबा फळगळ नियंत्रणासाठी, ऊत्पन्न वाढविण्यासाठी व फळाची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व सुपारीच्या आकाराची असताना १% पोटॅशियम नायट्रेट्ची तीन वेळा फवारणी करावी.<br>पाण्याची उपलब्धता असल्यास झाडांना विस्तारानुसार प्रती झाड १५०-२०० लि. पाणी १५ दिवसांच्या अंतराने द्यावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी जांभा जमिनीमधील आंबा कलमांना गवताचे आच्छादन द्यावे. झाडावरील सुकलेला मोहोर सकाळी १० ते संध्याकाळी ३ या वेळेत स्वच्छ करावा.<br>आंब्यातील फळगळ टाळण्यासाठी फळांना विद्यापीठ शिफारसीनुसार कागदी पिशव्यांच्या आच्छादन करण्यात यावे. |
| काजु | फळधारणा | काजुमध्ये काढणीयोग्य बी तयार झालेली आहे. तयार झालेल्या बीयांची काढणी करुन ती ऊन्हामध्ये योग्यप्रकारे वाळवावी. |
| नारळ | - | येत्या आठवड्यामध्ये वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार द्यावा. त्याचबरोबर उन्हापासून संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>नारळ पिकावर पांढ-या माशीचा प्रादुर्भाव आढळून आला असून नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे बसवावे तसेच तयार झालेली काळी काजळी धुवून काढण्यासाठी १% पिष्टमय पदार्थाची (स्टार्च) (१० ग्रॅम स्टार्च प्रति लिटर पाणी) फवारणी करावी. त्याचबरोबर जास्त प्रादुर्भाव दिसून आल्यास ०.५% निम तेलाची (५ ग्रॅम प्रति १० लि. पाणी) फवारणी करावी. तसेच किटक नविन क्षेत्रात पसरु नये यासाठी ०.००५% ईमिडाक्लोप्रिड (०.५ मिलि प्रति १० लि. पाणी)या किटकनाशकाची फवारणी करावी. |
| वायंगणी भात | ओंबी अवस्था | भात शेतीची कोळपणी करुन शेतीची बेणणी करावी. भात पिकास २० कि. ग्रम नत्र खताचा तिसरा हप्ता पिक फ़ुलो-यात असताना द्यावा. |
| भुईमुग | फुलोरा ते आरा | भुईमुग पीक फ़ुलो-यात असताना तसेच शेंगा भरण्याच्या वेळेस पाण्याच्या २ पाळ्यांमधील अंतर सुमारे १२ ते २० दिवस असावे.<br>भुईमुग पिक काही ठिकाणी फ़ुलोरा अवस्थेत असून हळव्या जाती आरा अवस्थेत आहेत. तरी भुईमुगाच्या पिकावरुन रिकामे पिंप फिरवल्याने जमिनीत घुसणा-या आ-यांची परिणामतः शेंगांची संख्या वाढल्याने भुईमुगाचे ऊत्पन्न वाढते. |
| सुर्यफुल | फुलोरा अवस्था | सुर्यफ़ुल पीकांना पाणी वेळेवर द्यावे व पीक संरक्षण करावे. सुर्यफ़ुलाची बीजधारणा चांगली होण्यासाठी फ़ुले उमलण्याच्या काळात ४ ते ६ दिवस रोज सकाळी ८ ते ११ वेळेच्या दरम्यान हातावर तलम कापड बांधून फ़ुलांवर हात फिरवावा किंवा शेतामध्ये मधमाश्यांच्या पेट्या ठेवाव्यात म्हणजे परागीकरण चांगल्याप्रकारे होऊन फ़ुलांतील बिया पुर्ण भरण्यास मदत होईल. |
| मोहोरी | शेंगा अवस्था | मोहोरी पिकांना वेळेवर पाणी द्यावे व पीक संरक्षण करावे. |
| चवळी | काढ़णी | चवळी काढ़णीस तयार झालेली आहेत. तयार झालेल्या शेंगा सकाळच्या वेळेस काढुन ऊन्हात चांगल्या वाळवाव्यात. |
| वाल | काढ़णी | वाल काढ़णीस तयार झालेली आहेत. तयार झालेल्या शेंगा सकाळच्या वेळेस काढुन ऊन्हात चांगल्या वाळवाव्यात. |
| कुळीथ | काढ़णी | कुळीथ पीक काढणीस तयार झालेले आहे. तयार झालेले पिक जमिनीलगत काढुन ऊन्हात चांगले वाळवावे. |
| जनावरे, कुक्कुट्पालन | - | दिवसाचे कमाल तापमान वाढत असल्याने कोंबड्यांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडला बाहेरुन पडदे लाऊन त्यावर पाणी शिंपडावे. कोंबड्यांना तसेच पिल्लांना पिण्यासाठी स्वच्छ गार पाण्याचा पुरवठा करावा. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|